दिनांक : ०३/११/२०११.

# कमी वीजनिर्मिती झाल्यामुळे महानिर्मितीवर होणारे अकार्यक्षमतेचे हेतु:पुरस्पर आरोप व त्यावर महानिर्मितीचा सविस्तर खुलासा

नुकत्याच पार पडलेल्या राज्य वीज नियामक आयोगाच्या जनसुनावणी सत्रातून तसेच काही प्रसारमाध्यमातून महानिर्मितीच्या कार्यक्षमतेविषयी काही प्रश्नचिन्हं उपस्थित करण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र वस्तुस्थितीची खातरजमा न करता तसेच त्यासंदर्भात कोणतीही शहानिशा न करता एकांगी स्वरुपात अशा बातम्या प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. अशा विपर्यस्त व अतिरंजित वृत्तामुळे महानिर्मितीसारख्या सामाजिक बांधिलकी जपून वीजनिर्मिती करणाऱ्या सरकारी उपक्रमाच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे महानिर्मिती पुढीलप्रमाणे खुलासा करत आहे :

१) अशा काही वृत्तात नमूद केल्याप्रमाणे महानिर्मितीने कबूल केल्यापेक्षा ८२५१ दशलक्ष युनिटस् इतकी वीज कमी दिल्यामुळे महावितरणला ती तूट भरुन काढण्यासाठी ७८१३ दशलक्ष युनिटस् वीज महाग दराने बाहेरुन घ्यावी लागली, असे विधान करताना विजेच्या खुल्या व्यापार करणाऱ्या खाजगी वीजउत्पादक कंपन्यांपेक्षा महानिर्मितीची वीज स्वस्त आहे हेच इथे आरोप करणाऱ्यांनी अप्रत्यक्षपणे सूचित व मान्यही केले आहे. म्हणजेच आपल्याच आरोपाच्या विधानात एक अंतर्गत विरोधाभास आहे याकडे त्यांचे कळत-नकळत दुर्लक्ष झालेले दिसते. कारण महानिर्मितीचा दृष्टीकोन व्यावसायिक-व्यापारी स्वरुपाचा नसून सामाजिक बांधिलकी जपणारा असल्यानेच महानिर्मिती महावितरणला तुलनेने सर्वात स्वस्त दरात वीजपुरवठा करते ही बाब इथे लक्षात घेण्यासारखी आहे.

२) महानिर्मितीचा कारभार जर खरोखर अकार्यक्षम असता तर अशा अकार्यक्षम कारभारातून अशी राज्यातील सर्वांत स्वस्त वीज पुरविणे महानिर्मितीला शक्य झाले असते का याचा आरोप करणाऱ्यांनी विचार केलेला दिसत नाही. तसेच जर तुलनात्मकदृष्ट्या अन्य खाजगी व्यावसायिक वीजउत्पादकांची कार्यक्षमता जास्त आहे तर मग उलट अशा वीजउत्पादकांकडून महावितरणला प्राप्त होणारी वीज ही महाग का याचे उत्तर आरोप करणाऱ्यांनी शोधावे. पक्का व्यावसायिक दृष्टीकोन बाळगून कार्यरत असलेल्या अन्य खाजगी वीजउत्पादकांच्या कामगिरीची तुलना (उदा. भारांक, वीजनिर्मिती इ.) महानिर्मितीच्या कामगिरीशी चुकीच्या पध्दतीने वारंवार केली जात आहे व प्रत्यक्षात या खाजगी उत्पादकांना विक्रीसाठी विजेच्या वाढीव दराला मंजुरी दिली जात आहे हे विसंगत नाही आहे काय? कार्यक्षमता वाढल्यास विजेचा दर उलट कमी असायला हवा. प्रत्यक्षात याउलट चित्र दिसत आहे. महानिर्मितीच्या कार्यक्षमतेविषयी वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या प्रवृत्ती या खाजगी व कार्यक्षम वीजउत्पादकांकडून **स्वस्त दरातील वीज** उपलब्ध व्हावी यासाठी मात्र असे दबावतंत्र का वापरत नाहीत हे अनाकलनीय आहे.

उत्तम देखभाल दुरुस्तीसाठी पुरेशी भांडवली गुंतवणूक केल्यास व उत्तम प्रतीच्या परंतु महागड्या विदेशी कोळशाचा वापर केल्यास महानिर्मितीची कार्यक्षमता नक्कीच वाढू शकते. पण अंतिमत: यातून विजेचा दर आटोक्यात ठेवणे कठीण होत जाणार आहे. महानिर्मितीने आपली कार्यक्षमता वाढवली तर ते कंपनीच्या आर्थिक फायद्याचे ठरेल व

कामगिरीचे निर्धारित निकष पूर्ण केल्यानंतर आयोगातर्फे महसुली खर्चाला मंजुरीही मिळेलच.... पण व्यापक अर्थाने खरे ग्राहकहित हे वीजग्राहकांना **स्वस्त वीज** पुरविण्यात आहे. महानिर्मिती स्वत:च्या फायद्यापेक्षा ग्राहकांना स्वस्त वीज कशी देता येईल यांस प्राधान्य देत असते. याउलट बाजारातील वीजटंचाईचा व्यापारी फायदा उकळणाऱ्या खाजगी वीजउत्पादकांच्या कार्यक्षमतेचा वीजग्राहकांना **स्वस्त वीज दराच्या स्वरुपातून** थेट फायदा होताना कधीही दिसत नाही. महानिर्मितीच्या अकार्यक्षमतेचा वारंवार डंका पिटणाऱ्यांचा अंत:स्थ हेतू काही वेगळाच जाणवतो. अगदी पध्दतशीरपणे महानिर्मितीची सर्वच पातळीवर आर्थिक कोंडी करुन महानिर्मितीविषयी वीजग्राहकांचे मत अशा निराधार वृत्तांतून कलुषित करुन या सरकारी उपक्रमाचे खच्चीकरण करण्याचा हा प्रयत्न असून या अशा वृत्तांमागील **बोलविता धनी** हा कोणी वेगळाच आहे याची भविष्यात वीजग्राहकांना देखील खात्री पटेलच.

३) अशा खोट्या-निराधार वावड्या उठवून वीजग्राहकांत महानिर्मितीविषयी असंतोष माजवून हा सरकारी उपक्रम एकदाचा बंद पडावा यासाठीच हे षडयंत्र हेतु:पुरस्कार घडविण्यात येत आहे. **मागणी-पुरवठा** बाबत अर्थशास्त्राचे गणित लक्षात घेतल्यास ज्या वस्तूची-सेवेची टंचाई असते तिचा दर वाढत असतो. परंतु, मक्तेदारी असूनही आजतागायत महानिर्मिती वा महावितरणने विजेच्या टंचाईचा कधीही व्यावसायिक फायदा घेतलेला नाही हे सत्य राज्यातील सर्व वीजग्राहकांना माहीत आहे. महानिर्मितीची वीज सर्वांत स्वस्त दराने महावितरणला उपलब्ध होत असल्याने काही खाजगी वीजउत्पादकांना निरकुंश दराने वीजविक्री करता यावी यासाठीच हा सर्व खटाटोप आहे. एकाप्रकारे खुल्या स्पर्धेच्या नांवाखाली ग्राहकहिताला हरताळ फासून वीजबाजारावर संपूर्ण कब्जा करण्याच्या प्रयत्नांचाच हा एक भाग जाणवतो. महावितरण सद्य:स्थितीला साधारणत: ८४३७१ दशलक्ष युनिटस् इतक्या प्रमाणात वीज खरेदी राज्यातील वीजग्राहकांसाठी करत असून त्यापैकी सुमारे ४६४६७ दशलक्ष युनिटस् खरेदी (एकूण वीज खरेदीच्या सुमारे ५५-६०%) ही सर्वांत स्वस्त दराने म्हणजे सरासरी सुमारे रु. २.७५/- प्रति युनिट या दराने महानिर्मितीकडून खरेदी करीत असते.

४) वीजग्राहकांचे हित अशाप्रकारे प्राधान्याने जपणाऱ्या महानिर्मितीला डबघाईला आणल्यास - महानिर्मितीचे अस्तित्व धोक्यात आल्यास व त्यामुळे ही ६०% वीज किंवा सर्वच्या सर्व वीज जर चढ्या व्यापारी दराने खुल्या बाजारातून खरेदी करायची वेळ महावितरणवर ओढवल्यास विजेचे दर कशा पध्दतीने गगनास भिडतील, याची कल्पना ग्राहकहिताचा निव्वळ आव आणून प्रत्यक्षात ग्राहकांचे अंतिमत: नुकसानच करणाऱ्या अशा **प्रातिनिधीक प्रवृत्तींना** नसेलच असे कसे म्हणता येईल? विजेचे दर हे एका प्रमाणाबाहेर गेल्यास ती सर्वसामान्य वीजग्राहकांच्या दृष्टीने **चैनीची सुविधा** ठरेल आणि सामाजिक हिताला त्यातून बाधा पोहोचेल. वीज ही सर्व मानवी गरजांसाठीची मूलभूत गरज असल्याने एकूणच समान सामाजिक-आर्थिक उन्नती साधण्यासाठी ती ग्राहकांना पुरेशा प्रमाणात व रास्त दराने उपलब्ध कशी होईल याकडे लक्ष देणे सध्या सर्वांत निकडीचे आहे. पण या वास्तवाकडे हेतु:पुरस्पर डोळेझाक करुन खाजगी वीजउत्पादकांना रान मोकळे करुन

देण्यासाठीच महानिर्मितीवर **अकार्यक्षमते** च्या नांवाखाली वारंवार शिंतोडे उडविले जात आहेत याकडे महानिर्मिती लक्ष वेधू इच्छिते.

५) महानिर्मितीची कार्यक्षमता १००% आहे असा कंपनीचा दावा कधीही नव्हता व नाही. परंतु, उत्तमोत्तम कार्यप्रणालीसाठी महानिर्मितीचे सर्व पातळीवर अथक परिश्रम प्रामाणिकपणे सुरु आहेत. कार्यक्षमतेतील काही त्रुटी वा उणिवा का-कशामुळे आहेत याची वस्तुनिष्ठ कारणमीमांसा कंपनी वारंवार सर्वांसमोर खुलेपणाने ठेवत असतानाही या कारणमीमांसेकडे डोळेझाक करण्यात येत आहे. २५ वर्षांहूनही जास्त आयुष्यमान झालेले बहुतांशी जुनाट संच, ओला व खराब दर्जाचा कोळसा पुरवठा, अपुरा इंधन पुरवठा, नैसर्गिक आपत्ती यांसारख्या वास्तव समस्या लक्षात न घेता महानिर्मितीसाठी कामगिरीचे निकष आयोगातर्फे निर्धारित करण्यात आले आहेत. उपलब्ध स्त्रोतांच्या पार्श्वभूमीवर हे निकषच मुळात अवास्तव-अवाजवी असल्याने त्यानुसार कामगिरी साध्य झाली नाही की त्या प्रमाणात वीज आयोगाकडून महानिर्मितीला महसूल नाकारण्यात येतो. सी.पी.आर.आय. या त्रयस्थ संस्थेने सुचविलेल्या शिफारशींनुसार जुन्या संचांमधील दुरुस्तीची-आधुनिकीकरणाची कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक केल्यानंतर व प्रत्यक्षात ही कामे पूर्ण झाल्यानंतर संचांची कार्यक्षमता वाढू शकते. परंतु, या सर्व शिफारशींची अंमलबजावणी एकदम करणे शक्य नसल्याने टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरु आहे. त्यामुळे कामगिरी उत्तरोत्तर सुधारण्यास भविष्यकाळात मदत होणार आहे. तथापि, ही सर्व कामे पूर्ण होईपर्यंत महानिर्मितीसाठी कामगिरीचे (Performance) हे निकष अनिवार्य करणे ही बाब महानिर्मितीवर अन्याय करणारी आहे. त्या संदर्भात महानिर्मितीने नियामक आयोगाकडे यापूर्वीच दाद मागितलेली आहे.

परंतु, अशा वृत्ताद्वारे काही ग्राहक प्रतिनिधी जनसुनावणीच्या माध्यमातून महानिर्मितीवर अकार्यक्षमतेचा आरोप करुन ग्राहकांचीच दिशाभूल करीत आहेत.

७) अशा वृत्तात महानिर्मितीची वीजनिर्मितीतील तूट ही ८२५१ दशलक्ष युनिटस् होती असे नमूद करण्यात आले आहे. परंतु, महानिर्मिती खुलासा करु इच्छिते की, सदर कालावधीतील या तुटीपैकी एकूण सुमारे ३६८२ दशलक्ष युनिटस् तूट ही चंद्रपूर येथील औष्णिक विद्युत केंद्रातील बहुतांशी संच दीर्घकाळ बंद पडल्याने झाली होती. ईरई धरणात पर्जन्यमानाअभावी पुरेसा पाणीसाठा नसल्याने व संबंधित तहसिलदार जिल्हाधिकाऱ्यांनी पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्य दिल्याने हे संच उन्हाळ्यात दीर्घकाळ बंद ठेवणे क्रमप्राप्त झाले होते, ही वस्तुस्थिती आहे.

पुरेसा पाऊस न झाल्यामुळे अभूतपूर्व पाणीटंचाई निर्माण होणे ही १००% नैसर्गिक आपत्ती आहे व त्यात महानिर्मितीच्या कार्यक्षमतेचा कोणताही संबंध येत नाही, याकडे सोयीस्कर कानाडोळा करुन अशा ग्राहक प्रतिनिधींनी संपूर्ण माहिती करुन न घेता मुद्दाम सदर चुकीची आकडेवारी सादर केली आहे हेच यातून सिध्द होते.

८) कोळशाच्या तुटवडयामुळे सदर कालावधीत ४० दशलक्ष युनिटस् इतक्या युनिटस्चा तुटवडा निर्माण झाला तर मुख्यत्वे खराब दर्जाचा कोळसा प्राप्त होत असल्याने त्यामुळे महानिर्मितीच्या वीजनिर्मितीत सुमारे ५१२५ दशलक्ष युनिटस्ची तूट आली तसेच पावसाळ्यातील ओल्या चिखलमातीमिश्रित कोळशाच्या समस्येमुळे सदर कालावधीत सुमारे २६२९ दशलक्ष युनिटस् ची तूट महानिर्मितीला सहन करावी लागली. उपलब्ध देशी कोळशाची प्रतवारी निकृष्ट असल्याने या कोळशाचा उष्मांक पुरेसा नसल्याने व बॉयलर डिझाईनप्रमाणे अनिवार्य असलेल्या उष्मांकाशी तो सुसंगत नसल्याने तो जास्त प्रमाणात जाळावा लागतो व इंधन कोळशापोटी अशाप्रकारे दुहेरी नुकसान महानिर्मितीला सातत्याने सहन करावे लागत आहे. ही बाब पुराव्यांनिशी महानिर्मितीने वारंवार नियामक आयोगाच्या, कोळसा पुरवठादारांच्या तसेच शासन पातळीवरदेखील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

याउलट अन्य खाजगी वीजउत्पादक महागड्या आयात कोळशाचा वापर जास्त प्रमाणात करतात वा ई-ऑक्शनच्या माध्यमातून उत्तम प्रतीचा महागडा कोळसा खरेदी करतात व त्यामुळे त्यांची कार्यक्षमता चांगली राखली जात असली तरीही त्यांचेकडून पुरविली जाणारी वीज ही महानिर्मितीपेक्षा महाग आहे. ही सर्व वस्तुस्थिती सर्वांनी लक्षात घ्यावी अशी विनंती महानिर्मितीतर्फे पुनःश्च करण्यात येत आहे.

९) गेल्या वर्ष-दीड वर्षात महानिर्मितीने सुमारे ३५-४० वर्षांहूनही अधिक काळ कार्यरत असलेले कमी क्षमतेचे काही जुने संच (Vintaged Units) आर्थिक कारणांमुळे (नियामक आयोगाने योग्य दर निश्चित न केल्यामुळे) बंद केले. वाढीव आयुष्यमानामुळे या संचांची कार्यक्षमता कमी झाली होती. तसेच राज्य वीज आयोगातर्फे हे जुने संच चालविणेपोटीचा जो वास्तविक प्रत्यक्ष खर्च येत होता त्यास मंजुरी मिळत नसल्याने नाईलाजापोटी महानिर्मितीला हे अव्यवहार्य संच बंद करावे लागले. त्यामुळे जानेवारी ते मार्च २०११ या कालावधीत सुमारे ५६१.३० दशलक्ष युनिटस् इतकी वीजनिर्मिती कमी झाली हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

१०) महानिर्मितीने दिलेल्या लक्ष्यापेक्षा कमी वीजनिर्मिती केली असा आरोप करताना अशा काही आरोपकर्त्यांनी फक्त त्यांच्या भूमिकेला सोयीस्कर अशीच आकडेवारी जनतेसमोर मांडली आहे. येथे **बॅकिंग डाऊन (Backing Down)** या संज्ञेअंतर्गत किमान मागणीच्या कालावधीत भारप्रेषण केंद्रातर्फे महानिर्मितीला आपल्या सुरळीत सुरु असलेल्या संचांतून वीजनिर्मिती त्वरीत कमी करण्यासंबंधी ज्या सूचना देण्यात आल्या व या सूचनांचे अनिवार्य पालन करावे लागले, याबाबत कोणताही उल्लेख केलेला दिसत नाही. सदर बाबीपोटी महानिर्मितीतर्फे या कालावधीत १७१.०० दशलक्ष युनिटस् एवढ्या प्रमाणात वीजनिर्मिती कमी झाली, परंतु या घटित उत्पादनात महानिर्मितीच्या कार्यक्षमतेचा संबंध कुठे येतो याचे उत्तर आरोपकर्त्यांनी शोधावे. ग्राहकांची तसेच आयोगाची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न दिसतो.

११) कमी वीजनिर्मितीमुळे झालेले आर्थिक नुकसान हे महानिर्मितीने वा पर्यायाने शासनाने सोसावे असेही काही ग्राहक प्रतिनिधींनी सूचित केले आहे. पण तसे केले तरीदेखील अंतिमत: तो भार अन्य कोणत्या तरी कररुपाने राज्यातील ग्राहकांवरच अप्रत्यक्षपणे पडेल याचा विचार त्यांनी केलेला दिसत नाही. महानिर्मितीच्या कारभाराची थेट तुलना व्यावसायिक वीजउत्पादकांशी किंवा एन.टी.पी.सी. सारख्या केंद्र सरकारच्या उपक्रमाशी करणे पूर्णत: योग्य नाही; कारण या अन्य कंपन्यांना उपलब्ध होणारा इंधन कोळसा, दुरुस्ती-देखभालीसाठी भांडवली गुंतवणूक, अभियंते-कर्मचारी यांचे वेतनमान-सोयीसुविधा यांची कोणत्याही पातळीवर तुलना होऊ शकत नाही. असे असतानाही विपरीत परिस्थितीत कंपनीचा गाडा ओढणाऱ्या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आणखी कमी कशी होईल अशा पध्दतीने हा आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा उडविला जात आहे. ग्राहकहिताचा आव आणणारे प्रतिनिधी खरोखरच ग्राहकांचे **प्रतिनिधी** आहेत की अन्य कुण्या खाजगी वीजउत्पादकांचे **प्रतिनिधी** आहेत याचा खुद्द वीजग्राहकांनीच विचार केला नाही तर आगामी काळात वीजक्षेत्रात एक अभूतपूर्व गोंधळ उडण्याची शक्यता नाकारता येत नाही हे स्पष्ट करण्यात येते.

१२) हल्ली स्पर्धात्मक निविदा (Competitive Bidding) संकल्पनेचा **व्यापक ग्राहकहिताचा** आव आणून स्वीकार करण्याची प्रथा रुढ होताना दिसते. परंतु, याही बाबतीत आता असे पुरेसे स्पष्ट होऊ लागले आहे की, दीर्घकालीन कराराच्या पारंपारिक प्रथेला फाटा देऊन स्पर्धात्मक बोली लावून ज्या खाजगी वीजउत्पादकांनी **काही महत्वाचे आगामी प्रोजेक्ट** बळकावले त्या उत्पादकांनीही आता कोळसा दरवाढीचे कारण देऊन मागील दाराने अधिक वीजदर मंजूर करण्यासाठी तगादा लावला आहे; ही बाब ग्राहकांपासून लपविली जात आहे. विजेच्या व्यापारातील सद्य:स्थिती लक्षात घेता कार्यक्षमतेच्या स्पर्धेच्या बुरख्याआड महागड्या विजेची खरेदी व्हावी यासाठी काही अनिष्ट प्रवृत्तींचे नियोजनबध्द प्रयत्न सुरु आहेत याची दखल ग्राहकांनी घेणे आवश्यक आहे. जोपर्यंत अन्य वीजउत्पादक कंपन्या या क्षेत्रात नव्हत्या तोपर्यंत स्वस्त असलेली वीज आता या स्पर्धात्मक युगात अचानक कशी महाग होऊ लागली आहे याचा ग्राहकांनीच विचार करावा व खुद्द ग्राहकांनीच पुढाकार घेऊन वीजकंपन्यांना आर्थिक संकटातून वाचविण्यास हातभार लावावा असे आवाहनही महानिर्मितीतर्फे करण्यात येत आहे. वीजक्षेत्रासारखे मूलभूत क्षेत्र हे राज्याच्या-राष्ट्राच्या एकूणच समग्र प्रगतीच्या-विकासाच्या दृष्टीने तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने संवेदनशील असणारे क्षेत्र असून या क्षेत्रावर सरकारी कंपन्याऐवजी खाजगी कंपन्यांनी चुकीच्या पध्दतीने कब्जा केल्यास आगामी काळात काय-काय होऊ शकते याची खूणगाठ ग्राहकांनीच बांधणे गरजेचे आहे.